17 MAR 2024

पुढारी

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सामंजस्य करारातून विद्यापीठाच्या प्रगतीत भर

## राज्य, देश व आंतरराष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक संस्था, उद्योगांशी करार

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

शिवाजी विद्यापीठाने गेल्या दहा वर्षांत राज्य, देशासह आंतरराष्ट्रीय विद्यापीठ, विविध शैक्षणिक संस्थांशी शैक्षणिक कार्यासाठी २०० हून अधिक सामंजस्य करार केले आहेत. यामुळे विद्यापीठाच्या व्यवसाय, संशोधन, शैक्षणिक प्रगतीत भर पडली आहे. या करारांचा फायदा विद्यापीठाचा शैक्षणिक स्थर उंचावण्यासाठी झाला आहे.

विद्यापीठाने आंतरराष्ट्रीय विद्यापीठे, शैक्षणिक संस्था तसेच उद्योग, कंपन्यांसमवेत २०१० पासून आजपर्यंत सुमारे १७५ हून अधिक सामंजस्य करार केले आहेत. याची मुदत दोन ते पाच वर्षे असते. गेल्यावर्षी देशांतर्गत २१, तर आंतरराष्ट्रीय ५ करार करण्यात आले. तीन वर्षांत ५० करार झाले आहेत. कराराच्या माध्यमातून दोन्ही संस्थांच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते.



शिवाजी विद्यापीठातून

विद्यापीठाच्या संगणक विज्ञान विभागाने संशोधन व शैक्षणिक क्षेत्रातील सहकार्यासाठी प्रगत संगणक विकास केंद्र पुणे यांच्यासोबत सामंजस्य करार केला आहे. करारामध्ये जिओ इन्फॉर्मेटिक्स, डेटा मायनिंग, वायरलेस सेन्सर नेटवर्क, डिझायनिंग, सॉफ्टवेअर अभियांत्रिकी, बहुभाषिक तंत्रज्ञान यावर भर दिला आहे. करारामुळे विज्ञान क्षेत्रातील विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी मिळणार आहेत. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोशनिर्मिती मंडळ, मुंबई यांच्यासोबत सामंजस्य करार झाला आहे. करारामध्ये आधुनिक इतिहास, राज्यशास्त्र आणि मराठी साहित्य विषयाचे ज्ञान मंडळ स्थापन केले आहे. करारामुळे मराठी विषयातील ज्ञान वाढविण्यासाठी याचा फायदा होणार आहे.

### परदेशांशी ४० हून अधिक करार

शिवाजी विद्यापीठाने अमेरिका, युनायटेड किंगडम, क्युबा, पोर्तुगाल, नायजेरिया, नेदरलँड, वेस्ट इंडीज, तैवान, केनिया, बांगला देश, जर्मनी, पोलंड, इटली देशांबरोबर विविध ४० हून अधिक सामंजस्य करार केले आहेत. या करारांमुळे विद्यार्थी, शिक्षक यांना शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात फायदा होत आहे.

**पुढारी विशेष**

शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा पुणे यांच्याशी संशोधनविषयक करार केला आहे. यामध्ये संयुक्त प्रकल्प, प्रयोगशाळांची निर्मिती, प्रयोगशाळा सहकार्यावर भर दिला आहे. संशोधनाचे तंत्रज्ञानात रूपांतर व औद्योगिक सहकार्य वृद्धी या दृष्टीने करार महत्त्वाचा आहे. विद्यापीठाने उद्योग क्षेत्रात काही नावीन्यपूर्ण करार केले असून, यामध्ये सांगली येथील समृद्धी फाऊंडेशनचा समावेश होतो. या करारामुळे रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होणार आहेत.

शिवाजी विद्यापीठ व द कमोईश इन्स्टिट्यूट पोर्तुगाल या दोन संस्थांमध्ये करार झाला आहे. यामध्ये पोर्तुगीज भाषा आणि संस्कृती प्रसार, शिक्षक प्रशिक्षण, वैज्ञानिक व सांस्कृतिक प्रकल्पांच्या अंमलबजावणीमध्ये सहकार्य केले जाणार आहे. करारामुळे भाषेचा प्रसार व व्याप्ती यासाठी भर दिला जाणार आहे. नवीन औषधनिर्मितीच्या संशोधनातील बदलामुळे शिवाजी विद्यापीठाने 'लुपिन' या औषध निर्माण कंपनीशी करार केला आहे. यामध्ये औषध निर्माण प्रक्रियेत संशोधनाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. औषध निर्माण क्षेत्रातील नवीन संशोधनास चालना मिळणार आहे.

शिवाजी विद्यापीठाने काही परदेशी विद्यापीठांशी महत्त्वपूर्ण करार केले आहेत. यामध्ये दक्षिण कोरियातील म्यांग्जी विद्यापीठाचा समावेश आहे. करारामुळे दोन्ही संस्थांमध्ये संशोधन सहकार्य वाढीस लागण्याबरोबरच विद्यार्थ्यांना संशोधनाच्या संधी उपलब्ध होणार आहेत. विद्यापीठाने साऊथ कोरियामधील चोनाम राष्ट्रीय विद्यापीठाशी सामंजस्य करार केला आहे. यामुळे संशोधन क्षेत्रात नावीण्यपूर्णतः, संशोधन क्षेत्रातील अनेक आव्हाने व अडचणींवर मात करणे सोपे जाणार आहे.

> “ शिवाजी विद्यापीठाने शैक्षणिक संस्था, उद्योग, कंपन्यांशी सामंजस्य करार केले आहेत. यामुळे अध्ययन, संशोधन याबरोबरच विद्यार्थ्यांना नवीन रोजगार मिळणे शक्य होणार आहे. सामंजस्य करारामुळे स्टार्टअप, मेक इन इंडियाला पाठबळ मिळत आहे. विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.
>
> **- प्रा. डॉ. सागर डेळेकर, संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व सहचार्य, शिवाजी विद्यापीठ**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAR 2024

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानमालेत बोलताना डॉ. मंजूश्री पवार. शेजारी डावीकडून डॉ. भारती पाटील, डॉ. अवनिश पाटील.

# शिवरायांचे विचार आत्मसात करणे गरजेचे

## डॉ. मंजूश्री पवार : विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर, ता. १६** : 'स्त्रियांचा मानवतावादी दृष्टिकोनातून विचार करणारे छत्रपती शिवाजी महाराज हे मध्ययुगीन कालखंडातील एकमेवाद्वितीय राजे होते', असे प्रतिपादन मराठा इतिहास अभ्यासक डॉ. मंजूश्री पवार यांनी आज येथे केले. 'केवळ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या घोषणा देऊन भागणार नाही, तर त्यांचे विचार आत्मसात करणे गरजेचे असल्याचेही त्या म्हणाल्या.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमालेअंतर्गत त्या बोलत होत्या. शारदाबाई पवार अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील अध्यक्षस्थानी होत्या.

डॉ. पवार म्हणाल्या, 'छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याचा काळ स्त्रियांबाबत मानवतावादी दृष्टिकोनातून विचार करण्यासाठीचा आश्वासक काळ होता. मध्ययुगीन जगाच्या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराज हे एकमेव राजे होते, ज्यांनी स्त्रियांना समाजात आदराची व सन्मानाची वागणूक दिली. स्त्रियांवर अन्याय, अत्याचार करणारा कोणीही असो, त्याला अतिशय कडक शिक्षा केल्या. सद्यस्थितीत स्त्रियांवरील अत्याचारांत दिवसेंदिवस वाढ होत आहे.'

डॉ. पाटील म्हणाल्या, 'छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन नेहमीच समतावादी होता. त्यांच्या समतावादी दृष्टिकोनाचे प्रतिबिंब त्यांनी स्थापित केलेल्या प्रशासकीय राज्य व्यवस्थेत आढळून येते. औरंगजेबाच्या दरबारातील लेखक खाफीखान यानेही त्यांच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनाचे कौतुक केले आहे. यावरून हे स्पष्ट होते की, तत्कालीन राजेशाही व्यवस्थेत त्यांच्यापूर्वी आणि नंतरही अन्य कोणाही राजाने स्त्रियांबाबत इतकी आदराची, सन्मानाची भूमिका घेतलेली दिसत नाही.' यावेळी मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, शिवचरित्रकार डॉ. इस्माईल पठाण उपस्थित होते. इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील यांनी प्रास्ताविक केले. राजश्री जगताप यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAR 2024
लोकमत

# स्त्रियांचा मानवतावादी विचार करणारे शिवाजी महाराज एकमेवाद्वितीय : पवार

## शिवाजी विद्यापीठात इतिहास विभागामार्फत व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : स्त्रियांचा मानवतावादी दृष्टिकोनातून विचार करणारे छत्रपती शिवाजी महाराज हे मध्ययुगीन कालखंडातील एकमेवाद्वितीय राजे होते, असे गौरवोद्गार मराठा इतिहास अभ्यासक डॉ. मंजुश्री पवार यांनी शनिवारी येथे काढले.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागात छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमालेअंतर्गत प्रमुख वक्त्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कै. शारदाबाई पवार अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील होत्या.

डॉ. पवार म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा काळ हा स्त्रियांच्या बाबतीत मानवतावादी दृष्टिकोनातून विचार करण्यासाठीचा आश्वासक काळ होता. त्यांनी स्त्रियांना समाजात आदराची, सन्मानाची वागणूक दिली.



शिवाजी विद्यापीठात इतिहास विभागाच्या व्याख्यानमालेत शनिवारी डॉ. मंजुश्री पवार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. भारती पाटील आणि डॉ. अवनीश पाटील उपस्थित होते.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. भारती पाटील म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन नेहमीच समतावादी होता. त्यांच्या समतावादी दृष्टिकोनाचे प्रतिबिंब त्यांनी स्थापित केलेल्या प्रशासनिक राज्यव्यवस्थेमध्ये आढळून येते.

यावेळी इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. राजश्री जगताप यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले. यावेळी मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, शिवचरित्रकार डॉ. इस्माईल पठाण,आदी उपस्थित होते.

17 MAR 2024
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवरायांचा स्त्रियांबद्दल मानवतावादी विचार

## डॉ. मंजूश्री पवार : छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमाला

कोल्हापूर : स्त्रियांबाबत मानवतावादी दृष्टिकोनातून विचार करणारे छत्रपती शिवाजी महाराज हे मध्ययीन कालखंडातील एकमेवाद्वितीय राजे होते, असे उद्गार मराठा इतिहास अभ्यासक डॉ. मंजूश्री पवार यांनी काढले. शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागात छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमालेअंतर्गत प्रमुख वक्त्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी शारदाबाई पवार अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील होत्या.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानमालेत बोलताना डॉ. मंजूश्री पवार. सोबत डॉ. भारती पाटील व डॉ. अवनीश पाटील.

डॉ. मंजूश्री पवार म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा काळ हा स्त्रियांच्या बाबतीत मानवतावादी दृष्टिकोनातून विचार करण्यासाठीचा आश्वासक काळ होता. मध्ययुगीन जगाच्या इतिहासामध्ये छत्रपती शिवाजी महाराज हे एकमेव राजे होते, ज्यांनी स्त्रियांना समाजात आदराची व सन्मानाची वागणूक दिली. स्त्रियांवर अन्याय, अत्याचार करणाऱ्यांना कडक शिक्षा केल्या. त्यामुळे केवळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या घोषणा देऊन भागणार नाही, तर त्यांचे विचार आत्मसात करणे गरजेचे आहे.

इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक, राजश्री जगताप यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले. व्याख्यानास मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, शिवचरित्रकार डॉ. इस्माईल पठाण आदी उपस्थित होते.

17 MAR 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कीटक विश्वाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला

## शालेय विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया; विद्यापीठात कीटक प्रदर्शनाचा समारोप

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित कीटक प्रदर्शनामुळे कीटक विश्वाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलून गेला. यापुढे कीटकांना, मधमाशांना मारणार नाही तर त्यांना जगविणार. कारण ते जगले तरच आपण जगू शकू, अशी भावना अनेक शालेय विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

विद्यापीठ प्राणीशास्त्र विभागात तीनदिवसीय कीटक प्रदर्शनास सुमारे ५ हजार विद्यार्थी, शिक्षक, पालक व नागरिकांनी भेट दिली. शेवटच्या दिवशी गर्दीने उच्चांक गाठला गेला. अभ्यागत शिक्षक, विद्यार्थ्यांनी चोख शिस्तीचे पालन करून प्रदर्शनाचा लाभ घेतला. तिन्ही दिवसांत मिळून १५ हजारांहून अधिक जणांनी प्रदर्शन पाहिले.

पर्यावरणामध्ये इतके वैविध्यपूर्ण कीटक, फुलपाखरे आहेत हे मला पहिल्यांदा समजले. त्यांच्यामुळेच जीवसृष्टीचे अस्तित्व कायम आहे. जैवसाखळीमधील त्यांचे महत्त्व येथील संशोधकांनी सांगितले. त्यामुळे कीटकवर्गाची हानी होणार नाही, यासाठी सर्वांनी प्रयत्न करायला हवेत, असे आर्या हडपल विद्यार्थिनीने सांगितले. शिक्षक इंद्रजीत थोरात म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने प्रदर्शनाच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना पर्यावरणविषयक जनजागृतीच्या कार्यात सहभागी करून घेतले ही बाब राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी सुसंगत आहे.



कोल्हापूर : विद्यापीठात आयोजित कीटक प्रदर्शन पाहण्यासाठी शेवटच्या दिवशी शालेय विद्यार्थ्यांनी मोठी गर्दी केली होती. (छाया : अर्जुन टाकळकर)

### ३५ वर्षांतील संशोधनाचे फलित..

प्राणीशास्त्र अधिविभागातील संशोधकांनी गेल्या ३५ वर्षांत वनविभाग आणि जैवविविधता मंडळ यांच्या सौजन्याने संशोधनासाठी विविध कीटक परिसरातील निसर्गसंपदेमधून संकलित केले आहेत. भावी पिढीमध्ये कीटकांविषयी जाणीवजागृती व्हावी म्हणून विविध प्रजातींच्या २२०० कीटकांचे प्रदर्शन मांडले. कोल्हापूर शहरासह हेर्ले, उजळाईवाडी, तामगांव, दुधाळ, पेठ वडगांव, इचलकरंजी, गडहिंग्लज, कुंभोज, शिरोळ, निपाणी, चंदगड, जत, सांगलीतील शाळा-महाविद्यालयांनी प्रदर्शनास भेटी दिल्या.

17 MAR 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विद्यार्थ्यांची भावना : कीटक प्रदर्शनाचा समारोप ; तीन दिवसांत पंधरा हजारांची हजेरी

# कीटकांना, मधमाश्यांना मारणार नाही, ते जगले तरच आपण जगू

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित भव्य कीटक प्रदर्शनामुळे कीटकविश्वाकडे पाहण्याचा आमचा दृष्टिकोन बदलून गेला. यापुढे आम्ही कीटकांना, मधमाश्यांना मारणार नाही, तर त्यांना जगविणार, कारण ते जगले तरच आपण जगू शकू, अशी भावना शुक्रवारी अखेरच्या दिवशी अनेक विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठातील या तीनदिवसीय कीटक प्रदर्शनाला रोज सरासरी पाच हजार विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि नागरिकांनी भेट दिली. अखेरच्या दिवशी तर गर्दीचा उच्चांक गाठला गेला. तिन्ही दिवसांत मिळून पंधरा हजारांहून अधिक जणांनी प्रदर्शन पाहिले. प्रदर्शनाला शहरातीलच नव्हे तर हेर्ले, उजळाईवाडी, तामगाव, दुधाळ, पेठ वडगाव, इचलकरंजी, गडहिंग्लज, कुंभोज, शिरोळ, निपाणी, चंदगड, जत, सांगली या ठिकाणच्या विविध शाळा-महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनीही भेटी दिल्या.



शिवाजी विद्यापीठातील कीटक प्रदर्शनाला विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि नागरिकांनी भेट देत शुक्रवारी गर्दीचा उच्चांक केला.

## विभागाच्या ३५ वर्षांतील संशोधनाचे फलित

शिवाजी विद्यापीठातील प्राणिशास्त्र अधिविभागातील संशोधकांनी गेल्या ३५ वर्षांत वनविभाग आणि जैवविविधता मंडळ यांच्या सौजन्याने संशोधनासाठी विविध कीटक परिसरातील निसर्गसंपदेमधून संकलित केले आहेत. या प्रदर्शनात २२०० कीटकांचा समावेश होता.

❝ शिवाजी विद्यापीठाने या प्रदर्शनाच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांनाही पर्यावरणविषयक जनजागृतीच्या कार्यात सहभागी करुन घेतले, ही बाब राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी अत्यंत सुसंगत आहे. यापुढील काळातही असे विद्यार्थीभिमुख उपक्रम आयोजित केले जावेत.

\- इंद्रजित थोरात, शिक्षक, संजय घोडावत इंटरनॅशनल स्कूल.

❝ आपल्या मुलाला प्रदर्शन दाखविण्यासाठी घेऊन आले होते. पण या प्रदर्शनामुळे माझ्या मुलालाच नाही, तर मलाही अनोख्या कीटकविश्वाची ओळख झाली. कीटकांना जपायला हवे, याची जाणीव झाली.

\- विद्या ताकवले (पालक)

❝ या प्रदर्शनामुळे माझा कीटकांकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलला. पूर्वी मला त्यांची किळस वाटायची आणि मी त्यांना मारुन टाकायचो. आता मात्र मी कीटक मारणार नाही. त्यांचे संवर्धन करणार.

\- सिद्धांत खोत (विद्यार्थी)

❝ पर्यावरणामध्ये इतके वैविध्यपूर्ण कीटक, फुलपाखरे आहेत, हे मला पहिल्यांदाच समजले. त्यांच्यामुळेच जीवसृष्टीचे अस्तित्व कायम आहे. त्यामुळे या कीटकवर्गाची हानी होणार नाही, यासाठी आपण मिळून प्रयत्न करायला हवेत.

\- आर्या हडपल (विद्यार्थिनी)

17 MAR 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कीटकविश्वाकडे पाहण्याची दृष्टी बदलली

## विद्यार्थ्यांनी व्यक्त केली भावना : विद्यापीठातील प्रदर्शनास प्रतिसाद

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या भव्य कीटक प्रदर्शनामुळे कीटकविश्वाकडे पाहण्याचा आमचा दृष्टिकोन बदलून गेला. यापुढे आम्ही कीटकांना, मधमाश्यांना मारणार नाही, तर त्यांना जगवणार, कारण ते जगले, तरच आपण जगू शकू, अशी भावना शुक्रवारी (दि.१५) अखेरच्या दिवशी अनेक विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

या तीनदिवसीय कीटक प्रदर्शनाला दररोज सरासरी पाच हजार विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि नागरिकांनी भेट दिली. अखेरच्या दिवशी तर गर्दीचा उच्चांक गाठला गेला. तरीही अभ्यागत शिक्षक, विद्यार्थ्यांनी अत्यंत चोख शिस्तीचे पालन करून प्रदर्शनाचा लाभ घेतला. तिन्ही दिवसांत मिळून पंधरा हजारांहून अधिक जणांनी प्रदर्शन पाहिले. प्रदर्शन पाहिल्यानंतर अनेक अभ्यागतांनी याविषयी भावना व्यक्त केल्या.

सिद्धांत खोत या शालेय विद्यार्थ्याने सांगितले की, या प्रदर्शनामुळे माझा कीटकांकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलला. पूर्वी मला त्यांची किळस वाटायची आणि मी त्यांना मारून टाकायचो. आता मात्र मी कीटक मारणार नाही. त्यांचे संवर्धन करण्याची जबाबदारी माझी आहे, हे मला समजले. आर्या हडपल या विद्यार्थिनीने सांगितले की, पर्यावरणामध्ये इतके वैविध्यपूर्ण कीटक, फुलपाखरे आहेत, हे मला पहिल्यांदाच समजले. त्यांच्यामुळेच जीवसृष्टीचे अस्तित्व कायम आहे. जैव साखळीमधील त्यांचे महत्त्व येथील संशोधकांनी आम्हाला सांगितले. त्यामुळे या कीटकवर्गाची हानी होणार नाही, यासाठी प्रयत्न करायला हवेत. संजय घोडावत इंटरनॅशनल स्कूलचे शिक्षक इंद्रजित थोरात म्हणाले की, या प्रदर्शनाच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना पर्यावरणविषयक जनजागृतीच्या कार्यात सहभागी करून घेतले, ही बाब राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी अत्यंत सुसंगत आहे. या प्रदर्शनासाठी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह सर्वच अधिकाऱ्यांचे सहकार्य लाभल्याचे समन्वयक डॉ. सुनील गायकवाड यांनी सांगितले.

17 MAR 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इंद्रधनुष्य महोत्सवात शिवाजी विद्यापीठ उपविजेता

## छत्रपती संभाजीनगरमध्ये आयोजित शोभायात्रेसह तीस कलाप्रकारांचे पारितोषिक वितरण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

छत्रपती संभाजीनगरमध्ये घेण्यात आलेल्या इंद्रधनुष्य युवक महोत्सवाचे विजेतेपद मुंबई विद्यापीठाने पटकावले. शिवाजी विद्यापीठाने पुणे विद्यापीठाला मागे टाकून उपविजेतेपदावर मोहर उमटवली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात इंद्रधनुष्य राज्यस्तरीय युवक महोत्सवाचा समारोप व पारितोषिक वितरण समारंभ कुलगुरू डॉ. विजय फुलारी, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्यासह मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी झाला.



**कोल्हापूर : इंद्रधनुष्य महोत्सवात उपविजेतेपद पटकावणारा शिवाजी विद्यापीठाचा संघ.**

महोत्सवात शिवाजी विद्यापीठ संघाने शोभायात्रेसह विविध कलाप्रकारांत प्रथम क्रमांक पटकावून उपविजेतेपद मिळवले. विद्यापीठाची महोत्सवातील कामगिरी अशी : सांस्कृतिक शोभायात्रा (प्रथम क्रमांक), स्थळ छायाचित्रण (प्रथम), स्थळ चित्रण (प्रथम), कातर काम (प्रथम) भारतीय समूहगीत (प्रथम), मातीकाम (द्वितीय), शास्त्रीय नृत्य -(द्वितीय), सुगम गायन (द्वितीय), पश्चिमात्य वाद्य वादन (द्वितीय), लघुपट (तृतीय), नाट्यगीत गायन (तृतीय), सांघिक रचनाकृती (तृतीय) आणि कला विभाग फिरता करंडक (सांघिक उपविजेते).

२० वा इंद्रधनुष्य महोत्सव ३ ते ७ नोव्हेंबर या कालावधीत डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAR 2024

पुढारी



कोल्हापूर : विद्यापीठाच्या वतीने आयोजित राजर्षी शाहू संगीत रजनी कार्यक्रमात शास्त्रीय गायन सादर करताना विदुषी कुबेर. समेवत कलाकार.

# शास्त्रीय संगीताच्या सुरेल मैफलीची रसिकांवर मोहिनी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

● राजर्षि शाहू संगीत रजनी कार्यक्रम

रार्जी शाहू संगीत रजनी कार्यक्रमात युवा गायिका गौतमी चिपळूणकर यांनी सादर केलेल्या शास्त्रीय गायनाने रसिकांना मोहिनी घातली. भेंडीबझार घराण्याच्या गायिका विदुषी कुबेर यांच्या गायनाने शास्त्रीय संगीताची मैफल विलक्षण रंगली.

शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने रामगणेश गडकरी हॉल येथे राजर्षी शाहू संगीत रजनी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवारी सायंकाळच्या पहिल्या सत्रात कोल्हापूरच्या युवा गायिका गौतमी चिपळूकर यांचे शास्त्रीय गायन झाले. त्यांनी सुरुवातीला राग गौड मल्हार गायला. विलंबित तिलवाडा तालात निबद्ध बंदिशीचे बोल होते 'काहे हो'. त्यानंतर तीनतालातील 'सैया मोरा रे' ही बंदिश गायली. त्यांना तबला साथ पं. सुरेश तळवलकर यांचे शिष्य प्रशांत भौमिक यांनी केली. हार्मोनिअमची साथ स्वरुप दिवाण यांनी केली.

दुसऱ्या सत्रात भेंडीबझार घराण्याच्या गायिका विदुषी कुबेर यांचे गायन झाले. त्यांनी राग कामोद प्रस्तुत केला. 'हूं तो जन मन छांडी' ही विलंबित बंदिश सादर केली. त्यानंतर राग जोगमध्ये उस्ताद अमान अलीखाँ यांच्या ताल रुपक व तीनतालमधील बंदिश सादर केल्या. त्यांना तबलासाथ पं. महेश देसाई तर हार्मोनिअम साथ सौमित्र क्षीरसागर यांनी केली. समन्वयक म्हणून संगीत व नाट्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांची जबाबदारी पार पाडली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAR 2024
पुढारी



प्रा. डॉ. पी. एन. भोसले



प्रा. डॉ. राहुल माने



प्रा. डॉ. किशोरकुमार खोत

# सौरऊर्जा निर्माण करणाऱ्या पदार्थ निर्मिती उपकरणास पेटंट!

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागातील संशोधकांच्या सौरऊर्जा निर्माण करणाऱ्या पदार्थांच्या निर्मितीचे उपकरण म्हणजेच अरेस्टेट प्रेसिपिटेशन टेक्निक उपकरणास १४ महिन्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर गुरुवारी भारत सरकारचे पेटंट जाहीर झाले. संशोधनामध्ये प्रा. डॉ. पी. एन. भोसले, प्रा. डॉ. राहुल माने, प्रा. डॉ. किशोरकुमार खोत यांनी योगदान दिले.




अरेस्टेट प्रेसिपिटेशन टेक्निक नावीन्यपूर्ण उपकरणापासून अनेक नवनवीन पदार्थांची यशस्वीरित्या निर्मिती करून त्याचा वापर विविध स्मार्ट, इलेक्ट्रिक व इलेक्ट्रॉनिक संशोधकीय विषयांमध्ये केला जात आहे. उपकरणाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे कमी तापमान, अत्यल्प रसायनांचा व उपकरणाचा खर्च, सुलभ हाताळणी यामुळे हे उपकरण संशोधकांना उपयोगी व मार्गदर्शनपर ठरणारे आहे. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह रसायनशास्त्राचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. के. डी. सोनवणे, औद्योगिक रसायनशास्त्राचे समन्वयक डॉ. गजानन राशीनकर यांचे मार्गदर्शन लाभले.

17 MAR 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'शाश्वत विकासासाठी स्वत:मध्ये बदल करावा'

## शहाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय चर्चा सत्रातील सूर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शाश्वत विकासासाठी माणसाने स्वत:मध्ये बदल करावा. जमीन, पाणी, ऊर्जा, पर्यावरण यांचा समतोल व संतुलित वापर करावा. पर्यावरण, चांगले आरोग्य व कायमस्वरूपी विकासासाठी शाश्वत विकासाच्या १७ ध्येयांची अंमलबजावणी करावी, असे आवाहन शाश्वत विकासावर काम करणाऱ्या तज्ज्ञांनी केले.

शहाजी छत्रपती महाविद्यालयात शनिवारी 'भारतातील शाश्वत विकास : धोरणे व नवीन प्रवाह' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात मान्यवरांच्या मनोगतामधून सूर उमटला. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण अध्यक्षस्थानी होते.

शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन म्हणाले, साधनसंपत्ती मर्यादित असून पुढील पिढीसाठी ती राखून ठेवणे महत्त्वाचे आहे. केवळ पैसा व भौतिक साधने म्हणजे विकास नाही, तर सुंदर आनंदी जीवन जगण्यासाठी ज्या ज्या गोष्टींची अत्यावश्यकता आहे, त्या असणे म्हणजे शाश्वत विकास होय.

बेळगाव येथील 'केएलई इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड एज्युकेशन रिसर्च'चे डॉ. पी. एम. कुलकर्णी म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये खूप टॅलेंट आहे. वेगवेगळे उद्योग, व्यवसाय, व्यापार यामध्ये कल्पनांचा वापर करणे गरजेचे आहे. शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे प्रमुख डॉ. ए. एम. गुरव म्हणाले, विद्यार्थ्यांनी चांगली कौशल्य आत्मसात करून विविध व्यवसायामध्ये प्रगती करावी. समन्वयक डॉ. आर. डी. मांडणीकर यांनी उपक्रमांची माहिती दिली. वाणिज्य विभागप्रमुख प्रा. संतोष कांबळे यांनी स्वागत केले. डॉ. एम. ए. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. व्ही. व्ही. मैंदुर्गी, डॉ. ए. जी. सूर्यवंशी, डॉ. व्ही. एस. शिरगुरे, प्रा. यु. ए. पाटील, डॉ. के. व्ही. मारुलकर, प्रा. श्रीकांत बच्चे आदी उपस्थित होते.

लोकमत

# नीना मेस्त्री-नाईक यांना उद्या श्रद्धांजली

कोल्हापूर : ज्येष्ठ पत्रकार व आकाशवाणीच्या प्रख्यात निवेदिका (स्व.) नीना मेस्त्री-नाईक यांच्या कार्याचा परिचय पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांना व्हावा, यासाठी येत्या सोमवारी (दि. १८) सकाळी ११:३० वाजता शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागातर्फे श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAR 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात नीना मेस्त्री-नाईक यांना श्रद्धांजलीसाठी सोमवारी सभेचे आयोजन

**कोल्हापूर :** ज्येष्ठ पत्रकार व आकाशवाणीच्या निवेदिका नीना मेस्त्री-नाईक यांच्या कार्याचा परिचय पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांना व्हावा, यासाठी सोमवारी (दि. १८) सकाळी ११.३० वाजता शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागातर्फे श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAR 2024

पुढारी



कोल्हापूर : महाराष्ट्र शासनाचा साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. उत्तम सकट यांचा सत्कार करताना कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील आदी.

# डॉ. सकट यांच्या सामाजिक कार्याचा विद्यापीठाला अभिमान : डॉ. शिर्के

**कोल्हापूर :** प्रामाणिक व जबाबदारीने कामे करणारे उपकुलसचिव डॉ. उत्तम सकट यांच्या सामाजिक कार्याचा विद्यापीठाला अभिमान आहे, असे कौतुकोद्गार डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले. डॉ. सकट यांना महाराष्ट्र शासनाचा २०२२-२३ चा साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल प्रशासनाच्या वतीने सत्कार करण्यात आला. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. तानाजी चौगुले, अनुष्का कदम, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे उपस्थित होते.

लोकमत

# सकट यांचे कार्य अभिमानास्पद : शिर्के

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : 'प्रामाणिकपणे आणि जबाबदारीने काम करणारे विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. उत्तम सकट यांच्या सामाजिक कार्याचा विद्यापीठाला अभिमान आहे,' असे कौतुकोद्गार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले.

डॉ. सकट यांना राज्य सरकारचा २०२२-२३ साठीचा 'साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे पुरस्कार' प्राप्त झाल्याबद्दल कुलगुरूंच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. शिर्के म्हणाले, 'डॉ. सकट यांनी लोकविकास केंद्र, वाहन विभाग, लेखा विभागामध्ये उत्तम कामगिरी केली आहे. पीएच. डी. संशोधनासाठी केलेल्या प्रबंधाचा पुढे समाजासाठी उपयोग होणे आणि त्याची दखल शासन पातळीवर घेतली जाणे, हे निश्चितच विद्यापीठासाठी भूषणावह आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAR 2024

पुण्यनगरी

# भक्ती बाटेचे 'नेट-जीआरएफ' मध्ये यश

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील



विद्यार्थिनी भक्ती बाटे हिने जून २०२३ मध्ये झालेल्या सीएसआयआर-नेट परीक्षेत ऑल इंडिया रँक ६५ मिळवली. बाटे रसायनशास्त्र अधिविभागातून २०२२ साली एम.एस्सी. ऑरगॅनिक केमिस्ट्री उत्तीर्ण झाली आहे. सीएसआयआर-यूजीसी-नेट-जीआरएफ उत्तीर्ण झाल्यानंतर देशातील कोणत्याही शैक्षणिक संस्थेत संशोधन करण्यासाठी पाच वर्षांसाठी फेलोशिप दिली जाते. या परीक्षेसाठी एकूण ४४ हजार ४२९ विद्यार्थी बसले होते. त्यामध्ये भक्ती हिचा एआयआर ६५ इतका आहे. तिला रसायनशास्त्र विभागातील अधिविभागप्रमुख डॉ. के. डी. सोनवणे आणि शिक्षकांचे मार्गदर्शन मिळाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAR 2024
लोकमत

# ‘आजीवन’मार्फत महिला दिन उत्साहात

## विद्यापीठात कार्यक्रम : टाइम मॅनेजमेंट आवश्यक : कुलकर्णी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागामार्फत शनिवारी जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.

प्रमुख पाहुणे म्हणून कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि डॉ. कल्याणी कुलकर्णी उपस्थित होते. अध्यक्षस्थानी विभागाचे संचालक डॉ. आर. जी. पवार होते.

शिवाजी विद्यापीठात झालेल्या या समारंभात डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी अनेक महिलांच्या कारकिर्दीची उदाहरणे देऊन महिलांनी समाजात केलेले कार्य समजावून सांगितले. यावेळी डॉ. कल्याणी कुलकर्णी यांनी 'भावनिक बुद्धिमत्ता' या विषयावर व्याख्यान दिले. त्या म्हणाल्या, भावनिक बुद्धिमत्ता जपण्यासाठी टाइम मॅनेजमेंट आवश्यक असते, त्यातून आपले मानसिक स्वास्थ्य चांगले राखले जाऊ शकते.

प्रारंभी प्राजक्ता पाटील यांनी स्वागत नृत्य सादर केले. एम. ए. योगशास्त्राच्या विद्यार्थिनी सुषमा जाधव आणि तन्वी माने यांनी सूत्रसंचालन केले. गीतांजली खांडेकर यांनी आभार मानले. या कार्यक्रमास विभागाचे सहायक प्राध्यापक वाय. एस. बोकील, आर. एम. जाधव, उदय घाटे, कानिफनाथ पांढरे, वीणा मालडिकर, प्रीती चव्हाण, आसावरी कागवाडे, वसंत सिंघन उपस्थित होत्या.